<u>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका स्थायी समिती नांदेड.</u>

सोमवार दि. 27.7.२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता नांवामनपा स्थायी समितीची सभा मनपाकेच्या मुख्य कार्यालयाचे प्रशासकिय इमारतीतील पहिल्या माळयावरील समिती सभागृहात मध्ये भरविण्यात आली होती. उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. स्थाई समितीचे सदस्य उपस्थित होते.

**श्री विनय विश्वांभरराव पाटील ,सभापती**

<u>सर्वश्री</u>

| | |
|---|---|
| पवळे उमेश देवराव | वाजेदा तब्बसुम अथर उल ईमान |
| गाडगे शंकर जयवंतराव | चाऊस हसीना बेगम साबेर |
| किशोर किशनलाल यादव, | अ.हबीब अ.रहिम बागवान |
| बावजीर शेख हबीब शेख अब्दुल्ला | मोरे संजय गंगाधर |
| अन्नेवार गंगासागर संदिप | इंदूबाई शिवाजीराव घोगरे |
| प्रविण बालाप्रसाद बियाणी | विनयकुमार जगदिश गुर्रम |
| संगिता पृथ्वीराज राओत्रे | ज्योती महेंद्र खेडकर |
| सलिमा बेगम नुरुल्ला खान | |

**सभापती** सर्व प्रथम उपस्थित स.सदस्य, प्राधिकृत अधिकारी श्री विजयकुमार मुंडे, मुख्य लेखा परिक्षक श्री आर.एस.कोलगणे, मुख्य वैद्यकिय अधिकारी, डॉ.आसिफ श्री गिरीष कदम, कार्यकारी अभियंता,श्री सुग्रीव अंधारे, का.अभियंता बिएसयुपी व सर्व विभाग प्रमुख, क्षेत्रिय अधिकारी याचे स्वागत करुन आजच्या सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यात येते.

**संजय मोरे** दिनांक ११.१२.२०१४ रोजी झालेल्या स्थायी समितीच्या सभेत आयत्यावेळी एक विषय घेण्यात आला. दिनांक २३.०२.२०१५ रोजी झालेल्या स्थायी समितीच्या सभेत आयत्यावेळी १४ विषय आणि दिनांक ११.०५.२०१५ रोजी झालेल्या स्थायी समितीच्या सभेत आयत्यावेळी १५ विषय घेण्यात आले हे सर्व आयत्यावेळीचे विषय सभागृहाची दिशाभूल करुन नियमबाहय घेण्यात आलेले असुन ते नियमानुसार सभागृहात वाचुन न दाखविण्यात आल्यामुळे हे सर्व आयत्यावेळेसचे प्रस्ताव रद्य करुन ते पुन्हा विषय पत्रिकेवर घेवुन सभागृहासमोर मान्यतेसाठी आणावेत असा माझा प्रस्ताव आहे.

**उमेश पवळे** श्री मोरे यांनी जे सांगीतले ते खरे आहे का याबाबत नगरसचिव यांनी खुलासा करावा.

**विनय गुर्रम** नगरसचिवांनी आम्हाला माहिती दयावी की आयत्यावेळेस जे प्रस्ताव पारीत करण्यात आले ते सभागृहासमोर वाचुन दाखवून आले होते का

**नगरसचिव** मागील सभेचे इतिवृत्त कायम करण्याचा विषय जेव्हा सभागृहात मांडण्यात येईल त्यावेळी इतिवृत्तात काही चुकीचे नमूद केले असेल ती बाब पिठासिन अधिका-यांच्या निदर्शनास आणून देवून पिठासिन अधिका-यास योग्य वाटतील तर नियमानुसार अशा दुरुस्त्या करता येतील. अशी तरतूद आहे त्यामूळे आजच्या सभेत मागील सभेच्या ठरावावर आज कोणताही निर्णय घेता येणार नाही. मागील सभेचे इतिवृत्ताचा विषय सभेसमोर येईल त्यावेळी चर्चा करण्यात यावी.

**संजय मोरे** महानगरपालिका स्थायी समितीचे कामकाज नियमावली मध्ये नगरपालिका सचिव प्रत्येक सभेत उपस्थित असलेल्या पालिका सदस्यांची नांवे आणि अशा सभेतील कामकाज या सबंधीचे कार्यवृत्त पालिका सभेनंतर दोन दिवसात किंवा त्यांनतर शक्य तितक्या लवकर तयार करील अशी तरतूद आहे. मागील दोन सभेत जे आयतेवेळी ३० विषय घेण्यात आले ते सभागृहात वाचुन दाखविण्यात आलेले नाही त्यामुळे ते सर्व ठराव रद्य करुन ते विषय पुढील सभेत विषय पत्रिकेवर घेवुन त्यावर निर्णय घेण्यात यावा. यावर सभागृहात मतदान घेवुन निर्णय घ्यावा.

**सभापती** मागील सभेचे इतिवृत्त कायम करण्याचा विषय विषयपत्रिकेवर नाही त्यामुळे आजच्या सभेत जे विषय विषयपत्रिकेवर आहेत त्यावर चर्चा करण्यात यावी. दुस-या विषयावर चर्चा करता येणार नाही.

**उमेश पवळे** श्री मोरे यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्यावर प्रथम निर्णय घेण्यात यावा. दादागीरी करण्यात येवु नये.

**विनय गुर्रम** मागील सभेत काय निर्णय झाले त्याची माहिती सभागृहास देणार आहात किंवा नाही. आयत्यावेळेस जे विषय घेण्यात आले ते सभागृहासमोर मांडण्यात आले होते काय.

**संजय मोरे** आयत्यावेळसच्या ३० विषयावर मतदान घेवुन बहुमताने निर्णय घेण्यात यावा. दादागीरी करुन नियमबाहय काम करुन घेण्यात येत आहेत. अशी दादागीरी चालणार नाही.

**सभापती** स्थायी समितीच्या सर्व सदस्यांच्या मान्यतेने अधिनियमातील तरतुदीनुसार आयत्यावेळेसच्या विषयांना मान्यता दिलेली आहे. नगरसचिव यांनी केलेल्या खुलाश्याप्रमाणे मागील सभेचे इतिवृत्त स्थायी समितीच्या समोर मान्यतेसाठी ठेवण्यात येईल. प्रश्नोत्तराचा तास सर्व साधारण सभेत असतो परंतु स्थायी समितीच्या सभेत प्रश्नोत्तराचा तास नसतो. आपणास आजच्या सभेत जे काही प्रस्ताव मांडावयाचे होते ते प्रस्ताव ३ दिवस अगोदर द्यावयास पाहिजे होते. आपणास ज्या विषयावर विरोध नोंदवायचा आहे तो नोंदवावा त्याची नोंद घेण्यात येतील इतर विषयावर चर्चा करण्यात येवु नये विषयपत्रिकेवर बोलावे.

**विनय गुर्रम** सभापतींनी दंडेलशाही करु नये. आमच्या स्वत:च्या हिताच्या विषयावर बोलत नसुन आम्ही महानगरपालिकेच्या हिताच्या विषयावर बोलत आहोत. स.सदस्य आयत्यावेळेस पारीत केलेल्या ठरावास मान्यता देणे बाबत बोलत आहेत. सभापतींनी स.सदस्यांबाबत चांगली भाषा वापरावी.

**उमेश पवळे** मागील सभेचे इतिवृत्त कोणत्या सभेत ठेवण्यात येणार आहे त्याची तारीख देण्यात यावी.

**संजय मोरे** स्थायी समितीने दिनांक ११.१२.२०१४ अन्वये ठराव क्र.१२५ अन्वये बीएसयुपी अंतर्गतची कामे कंत्राटदारांना कामे देण्यासाठी सभापती स्थायी समिती यांच्या अध्यक्षतेखाली २ स्थायी समितीच्या सदस्यासह आयुक्त यांची उप समिती कायम करुन त्यांना अधिकार देण्यात आले होते, परंतु या उप समितीत स्थायी समितीचे तीन सदस्य घ्यावयास पाहिजे होते, परंतु दोनच सदस्य घेण्यात आले. त्यामुळे दिनांक ११.१२.२०१४ रोजी संमत केलेला ठराव क्र.१२५ रद्य करण्यात यावा असा माझा प्रस्ताव आहे.

**उमेश पवळे** श्री मोरे यांचे प्रस्तावावर बहुमताने निर्णय घेण्यात यावा. श्री संजय मोरे यांच्या प्रस्तावाच्या बाजुने ज्यांना मत नोंदवावयाचे आहे त्यांनी हात वर करुन मत नोंदवावे.

खालील सदस्यांनी श्री संजय मोरे यांनी मांडलेल्या प्रस्तावाच्या बाजुने हात वर करुन आपले मत मांडले.

१) श्री उमेश देवराव पवळे २) श्री गाडगे शंकर जयवंतराव ३) श्री मोरे संजय गंगाधरराव

४) सौ.अन्नेवार गंगासागर संदिप ५) सौ.इंदुबाई शिवाजीराव घोगरे ६) श्री प्रविण बालाप्रसाद बियाणी ७) श्री विनयकुमार जगदिश गुर्रम ८) सौ.संगिता पृथ्वीराज राओत्रे ९) सौ. ज्योती महेंद्र खेडकर १०) श्रीमती सलिमा बेगम नुरुल्ला खान

**नगरसचिव** महानगरपालिका स्थायी समितीचे कामकाज नियमावलीतील तरतुदीनुसार स्थायी समितीने पारीत केलेल्या एखादया ठरावास फेरफार किंवा तो रद्य करण्याचे प्रस्तावित करण्यात आले असेल तर अश्या सभेची सर्व साधारणता: तीन पुर्ण दिवसाची नोटीस देण्यात येईल, आणि अशा सभेत त्यास ज्या ठरावात फरबदल करावायाचा असेल किंवा तो रद्य करावयाचा असेल तो ठराव आणि अशा ठरावात फेरफार करण्यासंबंधीचा किंवा तो रद्य करण्या संबंधीतचा प्रस्ताव किंवा सूचना तया नोटीसीमध्ये देण्यात आलेला पाहिजे अशी तरतुद आहे. ठराव क्रमांक १२५ हा पारीत होवुन ८ महिण्याचा कालावधी झालेला असून त्याची अमंलबजावणी झालेली आहे. त्यामुळे श्री संजय मोरे यांनी नियमानूसार प्रस्ताव द्यावा.

**विनय गुर्रम** आजच्या विषय पत्रिकेवर जवळपास ५७ विषय असुन या विषयाची विषय पत्रिका आम्हाला शनिवारी रात्री मिळाली रविवारी सुट्टीचा दिवस होता त्यामुळे या ५७ विषयावर अभ्यास करण्यास वेळ मिळालेला नाही त्यामुळे आजची सभा ८ दिवसा करीता तहकूब करण्यात यावी

तसेच मागील सभेतील आयत्यावेळस घेण्यात आलेल्या विषयाची यादी देंण्यात यावी. त्यानुसार सदर यादीवर तहकूब सभेत आम्हाला निर्णय घेता येईल.

**संजय मोरे** श्री विनय गुर्रम यांनी ५७ विषयावर अभ्यास करण्यासाठी वेळ देण्याची मागणी करुन सभा तहकूब करण्याची मागणी केलेली आहे. त्यानुसार आजची सभा तहकुब करण्यात यावी.

**उमेश पवळे** विषय पत्रिकेवर ५७ विषय आहेत. स.सदस्यांना या विषयांवर आभ्यास करण्यासाठी ८ दिवसाचा वेळ देण्यात यावा.

**संजय मोरे** सभा तहकूब करण्याचा ज्यांचे मत आहे त्यांनी हात वर करुन आपले मत नोंदवावे.

**सभापती** आजच्या विषय पत्रिकेवर महत्वाचे विषय आहेत. कच-यांचा प्रश्न आहे, बीएसयुपी अंतर्गत गोर गरीबांच्या घरकुलांचा प्रश्न आहेत, दलितवस्तीचे प्रश्न आहेत व इतरही नागरीकांना नागरी सुविधा पुरविण्याचे महत्वाचे विषय असल्यामुळे आजची सभा तहकूब करण्यात येवु नये.

**संजय मोरे** सभा तहकूबीचा निर्णय बहुमताने घेण्यात यावा. ज्यांना सभा तहकूब करावी असे वाटते त्यांनी हात वर करावे.

खालील सदस्यांनी सभा तहकूब करण्याच्या बाजुने हात वर करुन आपले मत नोंदविले.

१) श्री उमेश देवराव पवळे २) श्री गाडगे शंकर जयवंतराव ३) श्री मोरे संजय गंगाधरराव

४) सौ.अन्नेवार गंगासागर संदिप ५) सौ.इंदुबाई शिवाजीराव घोगरे ६) श्री प्रविण बालाप्रसाद बियाणी ७) श्री विनयकुमार जगदिश गुर्रम ८) सौ.संगिता पृथ्वीराज राओत्रे ९) सौ. ज्योती महेंद्र खेडकर १०) श्रीमती सलिमा बेगम नुरुल्ला खान

**सभापती** आजची सभा तहकूब करण्यात येते.

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव,**
नांवाशमनपा, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**सभापती,**
स्थायी समिती,
नांवाशमनपा, नांदेड.